# श्री स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

इतिहास विषयात

**पीएच.डी. साठी सादर करावयाचा प्रबंधाची सारांश पत्रिका**

संशोधन विषय

मंगळवेळा तालुक्याचा राजकिय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक
इतिहास एक चिकित्सक अभ्यास इ.स. १९५० ते २०००


संशोधक

**प्रा. गडहिरे रावसाहेब तुळशिराम**
इतिहास विभाग विज्ञान महाविद्यालय, सांगोला

मार्गदर्शक
**डॉ. एस.जी. जाधव**

**प्राध्यापक विभाग प्रमुख**
**इतिहास विभाग**
**पीपल्स कॉलेज, नांदेड.**

**प्रकरण पहिले**

**प्रास्ताविक:-**

मंगळवेढा तालुक्याला प्राचीन ऐतिहासिक, राजकिय, आर्थिक व सामाजिक, सांस्कृतिक परंपरा लाभलेली आहे. त्यामुळे इतिहासाच्या पोटात काही गोष्टी दुर्लक्षित राहिलेल्या आहेत. तसेच मध्ययुगीन व आधुनिक कालखंडातदेखील ऐतिहासिक सांस्कृतिक, आर्थिक व राजकिय बदल मोठ्या प्रमाणात घडून आलेले आहेत. याशिवाय आर्वाचिन कालखंडामध्येही या तालुक्याची विविध क्षेत्रात मोठ्या प्रमाणात प्रगती झालेली आहे. त्यामुळे या तालुक्याचे संशोधन करण्याचा माझा मानस आहे. या आधुनिक मंगळवेढा तालुक्यात ऐतिहासिक पार्श्वभूमीवर प्रकाश पडतो. हे संशोधन विद्यापीठीय स्तरावर म्हणजे भावी पिढीसाठी मार्गदर्शक मोलाचे ठरेल. यासाठीच हा विषय अभ्यास करण्यासाठी निवडलेला आहे.

**१.१) संशोधनाचे उद्देश (Objectives Of Research Topic)**

मंगळवेढा तालुक्याला राजकिय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिस्थिती ही फार मोठी परंपरा लाभलेली आहे. त्याची उकल करण्याचा माझ्या संशोधनचा मुळ हेतू आहे. त्यादृष्टीने मंगळवेढ्याचा ऐतिहासिक व सांस्कृतिक गोष्टीवरती फार मोठा प्रकाश पडणार आहे. राजकिय, सामाजिक व आर्थिक दृष्ट्या हा तालुका समृध्द विचाराचा असल्याने यावरती संशोधन करणे गरजेचे आहे. म्हणून हा विषय मी पीएच.डी साठी निवडलेला आहे. मध्ययुगीन काळ व आधुनिक काळामध्ये येथे शेती व व्यापार या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात प्रगती झालेली दिसुन येते. त्यावर प्रकाश टाकणे गरजेचे असल्याने हा विषय निवडला आहे.

**१.२) संशोधनाची गृहितके (Hypothesis Of Research Topic)**

कोणत्याही तालुक्यातील राजकिय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक संशोधनात प्रमेयाकडे वाटचाल करताना तेथे कच्चे दुये मांडले असतात. त्यास गृहितके म्हटले जाते. गृहिकांच्या बाबत कोहन हेगल म्हणतात. चौकशी व संशोधनास चालना देण्याऱ्या प्रारंभिक अडचणीचे व समस्येचे संभाव्य निराकरण व उत्तर सुचविल्याखेरीज संशोधन कार्यात पहिले पाऊल देखील पुढे उचलू शकत नाही. या अभ्यासासाठी खालील गृहितके निश्चित करण्यात आले आहे.

१) मंगळवेढा तालुका हा प्राचिन काळापासून याला इतिहास आहे. म्हणून महाराष्ट्रात पूर्व पश्चिम यामधील दुवा आहे.

२) सात्वन काळापासून त्या राजांनी मंगळवेढ्यावर राज्य केले हे मुल्य महाराष्ट्रात महत्वाचे आहे.

३) मंगळवेढा ही संतांची भूमी म्हणून महाराष्ट्रात प्रगत विज्ञाननिष्ठ मुल्ये व नव्या विचाराबरोबर आधारलेला होता.

४) मंगळवेढ्यातील संत दामाजीपंत, कान्हौपात्रा, बसवेश्वर यांनी नवीन सामाजिक, राजकिय, आर्थिक, सांस्कृतिक याची उकल करणे हे उचित आहे.

५) मंगळवेढ्यातील समाज रचना राजकिय परिस्थिती सामाजिक सांस्कृतिक इतिहासाची उकल करणे हे गरजेचे आहे.

**१.३) संशोधन पध्दत (Research Methodology)**

प्रस्तुतच्या प्रबंधनासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर केलेला आहे. तसेच मंगळवेढा तालुक्यातील प्राचीन मध्ययुगीन व आर्वाचिन कालखंडातील कागदपत्राच्या तसेच शिलालेख, मंदिरे व इतर धार्मिक स्थळांचे निरिक्षण करणार आहे. तसेच मुलाखती तंत्राचा वापरही करणार आहे. व काही दुय्यम साधनाचा वापर करणार आहे.

**१.४) संशोधनाची साधने (Sources Of Research Topic)**

मंगळवेढा तालुक्याचा अभ्यास केला असताना ऐतिहासिक कागदपत्रांचा वापर करणार आहे. तसेच मंगळवेढा नगरपालिका कागदपत्रे, तत्कालिक राजकी, घराण्याची कागदपत्रे, सोलापूर जिल्हा गॅझेट, लोकराज्य मासिक, सहकार संस्थांचा वृत्तांत, राजकिय व्यक्तिंची माहिती इत्यादी संदर्भ साधनांचा वापर करणार आहे.

**१.५) मंगळवेढ्याची भौगोलिक पार्श्वभूमी (Geographical Background Of Mangalwedha)**

मंगळवेढा तालुक्याच्या ऐतिहासिक दृष्टीकोणातून अभ्सास करण्यापूर्वी भौगोलिक पार्श्वभूमी विचारात घेणे आवश्यक आहे. कारण मंगळवेढा हा भिमा नदीच्या (चंद्रभागा) तिरावर वसलेला आहे. त्याचा मानवी जीवनाच्या जडणघडणीवर मोठ्या प्रमाणावर परिणाम होतो. या पार्श्वभुमीवर कृषी विभागामध्ये बदल झालेला दिसुन येतो. मानवी जीवनाची उत्पादनाची साधने, मानवाचे राहणीमान, संस्कृती, भाषा, भौगोलिक पार्श्वभुमी उदयाला येते. मंगळवेढा हा भाग दुष्काळी भागामध्ये मोडतो. हा भाग आवर्षन क्षेत्रात मोहतो. या आवर्षनाचा तालुक्याच्या इतिहासावर, जडणघडणीवर व विकासावर मोठा परिणाम झाला आहे. याचाही आढावा या प्रस्तुत प्रकरणात आहे.

**१.६) मंगळवेढ्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी (Historical Background Of Mangalwedha)**

प्राचीन काळापासून मंगळवेढा तालुक्याच ज्या ज्या ऐतिहासिक घडामेडी घडल्या त्याचा आढावा घेण्यात आला आहे. मराठी भाषेचे प्राचिनत्व दाखविणारा शके ४१०

चा ताम्रापट याच मंगळवेढा गावी इतिहासाचार्य वि.का.राजवाडे यांना मिळाला. चिकुर्डे येथील ताम्रापट ६५८ चा आहे. इ. स. ११६२ मध्ये मंगळवेढ्यावर कलचुरी राजवट होती. नंतरच्या काळात देवगिरीच्या यादवांची राजवट मंगळवेढ्यावेर निर्माण झाली. आधुनिक काळात स्वतंत्र्य चळवळीत याचा उल्लेख करण्यात आला आहे.

**प्रकरण दुसरे:-**

**मंगळवेढ्याची सामाजिक पार्श्वभूमी (Social Background Of Mangalwedha)**

मंगळवेढा तालुक्याला मोठी सामाजिक परंपरा आहे. मध्ययुगात मंगळवेढा येथील धान्याचे कोठार भूकेलेल्या दुष्काळ पिढीत लोकांना खुले करुन त्यांचे प्राण वाचविले. याबाबतही मंगळवेढ्याचा लौकिक महाराष्ट्रवर पसरविलेला आहे. येथे अनेक धर्माचे व जातीचे लोक अनेक वर्षापासून गुण्यागोविंदाने राहतात. हिंदु व मुस्लिम यांचे अनुक सन साजरे केले जातात. समारंभाच्या निमित्ताने सर्व समाज एकत्रित येतात व सन साजरे करतात. त्यामुळे येथे मोहरमचे ताबुत हिंदु मंदिरात बसविले जातात. तसेच हिंदु मंदिरामध्ये मुस्लिमांना मान आहे. शिवाय महात्मा बसवेश्वर यांच्या वीरशैव संप्रदयाचे अस्तित्व मोठ्या प्रमाणात आहे. एकंदरीत येथील समाज समतावादी व मानवतावादी विचाराचे असून मंगळवेढ्याचे सामाजिक जीवन सुखी आहे.

**प्रकरण तिसरे:-**

**मंगळवेढ्याची सांस्कृतिक परिस्थिती (Cultural Background Of Mangalwedha)**

मंगळवेढ्याला फार मोठा सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. मध्ययुगात संत दामाजी पंत, संत कान्होपात्रा, संत चोखामेळा असे अनेक थोर महात्मे हे विठ्ठल भक्त येथेच होऊन गेले. ते सर्व गोर-गरिबांचे कैवारी होते. संत दामाजी पंतावर आलेले संकट प्रत्यक्षात विठ्ठलाने घालविले अशी वदता आहे. तसेच मंगळवेढा ही रेवणसिध्दची पुण्यभूमी आहे. रेवणसिध्दचे सुपुत्र रुद्रमणी यांचे जन्मस्थान मंगळवेढा आहे. मध्ययुगीन काळात संत चोखामेळा हा महान संत होऊन गेला. त्याची समाधी मध्य चौकात आहे. कान्होपात्रा ही महिला संत होऊन गेली. अनेक सुपी वास्तव्य या मंगळवेढ्यात होते. एकंदरीत संताच्या वास्तव्याने पुणीत झालेल्या या भूमीत मोठा सांस्कृतिक वारसा असल्याचे दिसून येते.

**प्रकरण चौथे:-**

**मंगळवेढ्याची राजकिय पार्श्वभूमी (Political Background Of Mangalwedha)**

मंगळवेढ्याचा प्राचिन काळापासून मोठी राजकिय परंपरा लाभलेली आहे. बाराव्या शतकात बिज्नन नावाच्या जैन राज्याने आपले राज्य स्थापन केले आहे. पुढे हा प्रदेश देवगिरीच्या यादवांच्या अमलाखाली आहे. नंतरच्या काळात बिदरच्या बादशाहाच्या अंमलाखाली आला. पुढे हा प्रदेश निजामाच्या ताब्यात गेला. संभाजी राजाच्या काळामध्ये मंगळवेढा यांच्या अधीपत्याखाली होता. पुढे मोगल बादशाहीच्या वर्चस्वाखाली आला. इ. स. १७०७ नंतर पेशव्यांच्या वर्चस्वाखाली आला. इ. स. १८१८ नंतर तो इंग्रजांच्या ताब्यात गेला स्वातंत्र्यपूर्व कालखंडात असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळ, चले जाव चळवळ व क्रांतीसिंह नाना पाटीलचे पत्री सरकारमध्ये मंगळवेढा तालुक्यातील अनेक लोकांचा सहभाग होता. त्यामध्ये कि.रा. मर्दा वकील, स्व. रतनचंद शहा कॉंग्रेस व अनेक चळवळी झाल्या. स्वतंत्र उत्तर कालखंडात मंगळवेढा या तालुक्यावर कॉंग्रेसचे वर्चस्व राहिले आहे. येथे मर्दा वकील, विमलताई बोराडे, प्रा. लक्ष्मण ढोबळे, डॉ. राम साळे, श्री. भारतनाना भालके, श्री. रतीलाल शाह, श्री. आवताडे बंधु यांचे राजकिय वर्चस्व असल्याचे दिसून येते.

**प्रकरण पाचवे:-**

**मंगळवेढ्याची आर्थिक परिस्थिती (Fainancial Background Of Mangalwedha).**

प्राचिन, मध्ययुगीन, आर्वाचिन कालखंडामध्ये मंगळवेढा हा आर्थिकदृष्ट्या संपन्न असल्याचे दिसून येते. या भागामध्ये ज्वारीचे प्रचंड उत्पन्न होते. आधुनिक कालखंडामध्ये येथे सहकाराच्या माध्यमातून दोन खाजगी व सहकारी तत्वावर कारखाना उभा करण्यात आला आहे. यावरून येथे बागायतीचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते. येथे दुग्ध व्यवसाय, बँक, पतसंस्था यांचे जाळे मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून येते. तसेच येथे डाळींब लागवडीही मोठ्या प्रमाणात आहे. मंगळवेढा हे महाराष्ट्र व कर्नाटक गाव म्हणून बाजारपेठ असल्याचे दिसून येते. एकंदरीत आर्थिक स्थितीत मजबुत असल्याचे आढळून येते.

## प्रकरण सहावे:-

### उपसंवाहार (Conclusion)

मंगळवेढा तालुका ऐतिहासिकदृष्ट्या, राजकियदृष्ट्या, सांस्कृतिकदृष्ट्या अत्यंत महत्वाचा आहे. कारण येथे या सर्व उज्वल परंपराचा विकास झाल्याचे दिसून येते. त्यामुळे अनेक काळापासून लपून राहिलेला अत्यंत महत्वाचा विषय लोकांच्या अभ्यासाचा होईल. त्यामधुन नव्या पिढीला प्रेरणा मिळेल यासाठी हा विषय पीएच.डी च्या प्रबंधासाठी निवडण्यात आला आहे.

### संदर्भ ग्रंथ सुची:-


१) सोलापूर जिल्हा गॅझेटचा अभ्यास.
२) सोलापूर जिल्हाचा इतिहास- डॉ. देशमुख एस.एन.
३) संत चोखोबा चरित्र- डॉ. प्राचार्य आ.बो. पुजारी.
४) संत दामाजी पंताचे चरित्र- डॉ. देशमुख आर.एन.
५) मंगळवेढ्याचा इतिहास- डॉ. प्रा. चौधरी टी.एन.
६) सोलापूर जिल्हाचा इतिहास- डॉ. गोपाळराव देशमुख
७) मंगळवेढा नगरपालिकेचा इतिहास- डॉ. अशोक माने अप्रकाशित प्रबंध
८) संत दामाजी सहकारी कारखाना वार्षिक अहवाल.
९) पंढरपूर नगरीचा इतिहास- डॉ. पाटोळे एम.टी.
१०) दामाजीपंत एक्सप्रेस वर्तमानपत्र
११) मंगळवेढा नगरी वर्तमानपत्र
१२) सोलापूर लोकमत
१३) सोलापूर संचार
१४) दैनिक सकाळ



संशोधक
प्रा. गडहिरे रावसाहेब तुळशिराम
इतिहास विभाग विज्ञान महाविद्यालय,
सांगोला. मो.नं. ९४२१०३३२७०

मार्गदर्शक
डॉ. एस.जी. जाधव
प्राध्यापक विभाग प्रमुख इतिहास विभाग
पीपल्स कॉलेज, नांदेड